## सी बी एस ई उडान योजना

भारतीय समाजात मुलीच्या जन्माबाबत सकारात्मक विचार वाढवणे, मुलींना शैक्षणिक दृष्ट्या सक्षम बनविणे, अभियांत्रिकी शिक्षणात मुलींचे प्रमाण वाढविणे, त्यांना तंत्र शिक्षण व अभियांत्रिकी शिक्षणाच्या उत्तम संधी उपलब्ध करून देणे याकरिता ही योजना सुरु झाली. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ आणि भारत सरकारचे मनुष्यबळ आणि विकास मंत्रालय यांनी मिळून ही योजना सुरु केली.





लाभार्थी - इयत्ता ११ वी व १२ वी त शिकणाऱ्या विद्यार्थिनी.

पात्रता:

१. अर्जदार विद्यार्थिनीने भारतीय नागरिक असणे आवश्यक.

२. अर्जदार विद्यार्थिनीने तिचे ११ वी चे शिक्षण केंदीय विद्यालयाची कोणतीही शाखा, अथवा नवोदय शाळा, अथवा संबंधित राज्याच्या सरकार द्वारे मान्यताप्राप्त सरकारी शाळा, अथवा सीबीएसइ शी संलग्न असलेल्या भारतातील कोणत्याही खाजगी शाळेत घेतले असले पाहिजे.

३. अर्जदार मुलीने ११ वी मध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व गणित या विषयांसह विज्ञान शाखेची निवड केली असली पाहिजे.

४. अर्जदार मुलीला इयत्ता १० वी मध्ये किमान ७० % गुण व विज्ञान आणि गणित या विषयांमध्ये ८० % गुण असणे आवश्यक आहे.  जर तिचे शिक्षण सीजीपीए पद्धतीने गुण देणाऱ्या शाळेत झाले असेल तर किमान सीजीपीए ८ व विज्ञान विषयांसाठी जीपीए स्कोअर ९ असणे आवश्यक आहे.




***<u>अर्ज कसा करावा?</u>***

१. सीबीएसई उडान योजनेच्या अधिकृत वेबसाईट ला भेट द्या.) उडान ऑनलाईन पोर्टल वर रजिस्ट्रेशन करा.

२. अर्ज करण्याच्या सूचना व इतर माहिती काळजीपूर्वक वाचा.

३. अर्ज अचूक माहितीसह भरा.

४. अर्ज सबमिट केल्यावर रजिस्ट्रेशन नंबर स्क्रीनवर दिसतो. तो इमेल द्वारे अर्जदाराला पाठवला जातो. याकरता अर्जदाराने आपला इमेल पत्ता अचूकपणे भरणे आवश्यक आहे.

५. जन्मतारीख व रजिस्ट्रेशन नंबर दिलेल्या स्लॉटमध्ये टाकून छायाचित्र अपलोड करावे.

६. अर्ज डाऊनलोड करून त्याची प्रिंट घेऊन ठेवावी.

(https://www.cbse.gov.in/cbsenew/cbse.html

***<u>आवश्यक कागदपत्रे</u>***

१. विद्यार्थीनीचे आधार कार्ड

२. पत्त्याचा पुरावा

३. अर्जदाराच्या पालकांचा वार्षिक उत्पन्नाचा दाखला.

४. कोर्ससाठी फी भरल्याची पावती

५. दहावी च्या परीक्षेचे गुण पत्रक.

६. अर्जदाराचे जात प्रमाणपत्र

७. बँक पासबुक व बँक खात्याची माहिती

***संपर्क तपशील*** :

सीबीएसई मदतीसाठी इ मेल- – udasn.cbse@gmail.com

सीबीएसई मदतीसाठी फोन नंबर- – 011-23214737, 011-23231820, 011-23220083